## । गणपतिस्तोत्रम् ।

श्रीमद् आदिशंकराचार्यांनी पंचचामर वृत्तात (गण- ज र ज र ज गा) रचलेले हे स्तोत्र अत्यंत गेय असून त्यांच्याच गणेशपंचरत्नम या स्तोत्रापेक्षा समजण्यास सोपे आहे. श्री गजाननाचे अत्यंत मधुर वर्णन या स्तोत्रात केलेले आहे.

| | |
|---|---|
| सुवर्णवर्णसुन्दरं सितैकदन्तबन्धुरं | सुरेख सोनकांति शुभ्र दात एक शोभतो |
| गृहीतपाशकाङ्कुशं वरप्रदाभयप्रदम् । | हमी वरप्रदान, पाश अंकुशा धरीत, तो । |
| चतुर्भुजं त्रिलोचनं भुजङ्गमोपवीतिनं | जयास तीन नेत्र चार हात, स्थान पद्म ते |
| प्रफुल्लवारिजासनं भजामि सिन्धुराननम् ॥ १ | गजानना नमू भुजंग जानवे हि शोभते ॥ १ |

मराठी- ज्याचा सोन्यासारखा रंग सुंदर दिसतो, ज्याचा एकच शुभ्र दात सुंदर दिसतो, ज्याने हातात फास आणि अंकुश धारण केला आहे, जो (भक्तांना) वरदान आणि अभय देणारा आहे, ज्याला चार हात आणि तीन डोळे आहेत, ज्याने नागाचे जानवे घातले आहे, जो फुललेल्या कमळाच्या आसनावर बसला आहे, त्या गजाननाची मी पूजा करतो.

| | |
|---|---|
| किरीटहारकुण्डलं प्रदीप्तबाहुभूषणं | मुगूट माळ डूल तेजपुंज रत्न भूषणे |
| प्रचण्डरत्नकङ्कणं प्रशोभिताङ्घ्रियष्टिकम् । | करा हिरेजडीत वाकि, ढाळदार पैंजणे । |
| प्रभातसूर्यसुन्दराम्बरद्वयप्रधारिणं | सुरेख दोन वस्त्र बालसूर्य तेज भासते |
| सरत्नहेमनूपुरं प्रशोभिताङ्घ्रिपङ्कजम् ॥ २ | सोनसाखळी तशी पदांबुजी विराजते ॥ २ |

( ढाळ - मोत्यांचे तेज )

मराठी- ज्याने मुकुट, हार, कर्णभूषणे, यांबरोबर तेजस्वी हातांवर अलंकार धारण केले आहेत, मौल्यवान हि-यांचे कंकण धारण केले आहे, ज्याच्या चरणांवर अतिशय सुंदर मोत्यांची माळ आहे. ज्याने उगवत्या सूर्यासारखी दोन सुंदर वस्त्रे परिधान केली आहेत, आणि पदकमले सोन्याच्या पैंजणांनी सुशोभित झाली आहेत......

टीप- यष्टिका या शब्दाचा एक अर्थ मोत्यांची माळ असा आहे. काही अभ्यासकांनी 'यष्टिका' या शब्दाचा अर्थ सोटा किंवा जाडजूड दंड असा घेतलेला आहे. त्यानुसार गणपतीचे दंडाप्रमाणे पाय सुंदर आहेत असा अर्थ होईल. गजाननावर हत्तीचे रूपक केले असल्याने गणपतीचे पाय हत्तीप्रमाणे

आहेत असे म्हणता येईल. गूढगुल्फ या गणपतीच्या नावातून त्याचे घोटे (हत्तीप्रमाणे) गुप्त आहेत असे सूचित केले आहे.

| | |
|---|---|
| सुवर्णदण्डमण्डितप्रचण्डचारुचामरं | विशाल चामरास हेम कामट्या, शशी जसा |
| गृहप्रतीर्णसुन्दरं युगक्षणं प्रमोदितम् । | सुरेख, इच्छुका सुखी करीत, आशुतोषसा । |
| कवीन्द्रचित्तरञ्जकं महाविपत्तिभञ्जकं | कवीमना करी प्रसन्न, नष्ट संकटा करी |
| षडक्षरस्वरूपिणं भजेद्गजेन्द्ररूपिणम् ॥ ३ | गजेन्द्र-अर्चना करा स्वरूप जे षडाक्षरी ॥ ३ |

मराठी- ज्याची विशाल आणि सुंदर चवरी सोन्याच्या काठ्यांनी सजलेली आहे, जो (इच्छुक भक्तांना) गृहसौख्य प्रदान करतो आणि जो चंद्रासारखा सुंदर आहे, जो क्षणार्धात आनंदी होतो (जो अल्पसंतुष्ट आहे), जो कवींच्या मनाला प्रसन्न करतो, आणि मोठ्या संकटांचा नाश करतो, जो सहा अक्षरी मंत्राच्या स्वरूपात आहे, अशा श्रेष्ठ हत्तीच्या रूपातील गणेशाची पूजा करा.

टीप- गणपतीचे अनेक मंत्र प्रचलित आहेत. त्यातील ॐ ‘ वक्रतुण्डाय हुम् ’ हा षडक्षर मंत्र म्हणून ज्ञात आहे.

| | |
|---|---|
| विरिञ्चिविष्णुवन्दितं विरूपलोचनस्तुतिं | प्रजापती, हरी करी प्रणाम, शंभुही स्तुती |
| गिरीशदर्शनेच्छया समर्पितं पराम्बया । | समर्पणा करीत शंभुदर्शनार्थ पार्वती । |
| निरन्तरं सुरासुरैः सपुत्रवामलोचनैः | मुले, सुलोचना नि देव दैत्य नित्य चिंतिती |
| महामखेष्टमिष्टकर्मसु (स्मृतं) भजामि तुन्दिलम् ॥ ४ | महान याग संपण्यास, वंदु स्थूल प्रकृती ॥ |

मराठी- ब्रह्मा आणि विष्णू ज्याला नमन करतात आणि शिवाने ज्याची स्तुती केली आहे, ज्याला श्रेष्ठ पार्वतीने गिरीशाला पाहण्याच्या इच्छेने समर्पित केले आहे, देव आणि दानव त्यांच्या पुत्रांसह, सुंदर नयनांनी (नयनांच्या स्त्रियांसह), मोठे यज्ञ आणि त्यांच्याशी संबधित गोष्टीत यश यावे म्हणून ज्याचे स्मरण करतात, अशा गुटगुटीत शरीराच्या गणेशाचे मी पूजन करतो.

| | |
|---|---|
| मदौघलुब्धचञ्चलालिमञ्जुगुञ्जितारवं | मधूप मोहुनी मदे अती अधीर गुंजती |
| प्रबुद्धचित्तरञ्जकं प्रमोदकर्णचालकम् । | जनांस मोद दे सुजाण, तेवि कान हालती । |
| अनन्यभक्तिमानवं प्रचण्डमुक्तिदायकं | अनन्य भक्ति जो करी तयास मुक्ति देतसे |
| नमामि नित्यमादरेण वक्रतुण्डनायकम् ॥ ५ | गजानना प्रणाम नित्य नायका करीतसे ॥ ५ |

**मराठी- (गंडस्थळातून वाहणार्याध) मदाने मोहित होऊन चंचल भुंग्याचे मंजुळ गुंजन ज्याच्या कानावर पडत आहे, जो ज्ञानी जनांच्या चित्ताला आनंद देतो, जो आनंदाने आपले कान हलवतो, अनन्य भावाने भक्ती करणा-या मानवांना जो संपूर्ण मुक्ती देतो, अशा वक्रतुण्डाला मी नेहेमी आदराने नमस्कार करतो.**

**टीप- पूर्वी एका श्लोकात म्हटल्याप्रमाणे आचार्यांनी हे गणेशावर हत्तीचे रूपक घेतले असल्याने येथे कान हलण्याचा व गंडस्थलातून मद स्रवण्याचे उल्लेख आलेले दिसतात. त्यांच्या गणेशावरील इतर स्तोत्रांमध्येही अशा त-हेचे उल्लेख आहेत.**

| | |
|---|---|
| **दारिद्र्यविद्रावणमाशु कामदं** | **तात्काळ नाशी गरिबी नि देई** |
| **स्तोत्रं पठेदेतदजस्रमादरात् ।** | **जे इच्छिले सर्व, जो स्तोत्र गाई ।** |
| **पुत्रीकलत्रस्वजनेषु मैत्री** | **भावार्त, दारा सुत लाभताहे** |
| **पुमान्भवेदेकवरप्रसादात् ॥६॥** | **नाती सुखाची, गणराज पाहे ॥ ६** |

**मराठी -दारिद्र्याचा तातडीने नाश करणारे व इच्छित बाबी देणारे हे स्तोत्र जो आदराने (भक्तिपूर्वक) म्हणेल त्याला एकेश्वर गणपतीच्या कृपेने पुत्रप्राप्ती होईल व पत्नी आणि इतर नातलगांबरोबर त्याचे सौख्याचे संबंध निर्माण होतील.**

इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं गणपतिस्तोत्रं सम्पूर्णम् ।

*******************************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१)

https://www.facebook.com/search/top?q=स्तोत्र%20मंजूषा%20-%20stotra%20manjusha

www.stotramanjusha.com